'आरटीआय' कार्यकर्ते अमित कांबळे यांचा 'आप'मध्ये जाहीर प्रवेश!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | मंगळवार दिनांक 11/11/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 262 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com



# महापालिकेला केंद्र सरकारचा 'शहरी वाहतूक उत्कृष्टता पुरस्कार'

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेने शाश्वत, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक शहरी वाहतूक व्यवस्थेसाठी राबवलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. या उपक्रमांसाठी महापालिकेला केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयामार्फत “शहरी वाहतूक उत्कृष्टता पुरस्कार” प्रदान करण्यात आला आहे.**

नवी दिल्ली येथे झालेल्या अर्बन मोबिलिटी परिषदेत केंद्र सरकारच्या वतीने केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी, केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार राज्यमंत्री तोखन साहू, भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाचे सचिव श्रीनिवास कटिकिथला, विशेष कार्यकारी अधिकारी जयदीप यांच्यासह केंद्र सरकारचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सहशहर अभियंता बापू गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनिल पवार तसेच आयटीडीपी इंडिया संस्थेचे प्रांजल कुलकर्णी आणि आशिक जैन यांनी हा सन्मान स्वीकारला. “सर्वाधिक नाविन्यपूर्ण वित्तीय यंत्रणा असलेले शहर” (City with the Most Innovative Financing Mechanism) या श्रेणीत हा पुरस्कार महापालिकेला प्राप्त झाला आहे.

**शहराच्या वाहतुकीत हरित बदल घडविण्याचा उपक्रम....**

पिंपरी चिंचवड महापालिकेने देशातील पहिले ग्रीन बॉण्ड जारी करून गैरमोटारीकृत वाहतूक (Non-Motorised Transport – NMT) क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकले आहे.महापालिकेने ग्रीन बॉण्डद्वारे २०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला असून, या निधीतून हरित सेतू प्रकल्प आणि टेल्को रोड पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे नागरिकांना सुरक्षित व सावली असलेले पादचारी मार्ग, सुरक्षित सायकल मार्ग, सुरक्षित शाळा क्षेत्रे, सायकल पार्किंग, वृक्षलागवड, पावसाच्या पाण्याने परिसरात जमिनीतील पाणी पुनर्भरण आणि मार्गदर्शक फलकासह रस्ते फर्निचर यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. हरित सेतू उपक्रमांतर्गत निगडी प्राधिकरण परिसरातील १७ किलोमीटर रस्त्यांवर विकासकामे सुरू करण्यात आली आहेत.हरित सेतू रस्ते विकसित झाल्यानंतर केलेल्या सर्वेक्षणानुसार बहुतांश नागरिकांनी हे रस्ते मुलांसाठी आणि महिलांसाठी अधिक सुरक्षित असल्याचे सांगितले, तर अनेक लोक प्रतिनिधींनी/नागरिकांनी अशा रस्त्यांची संकल्पना शहरभर राबवावी, असे मत व्यक्त केले आहे. या रस्त्यांवर सुरक्षितपणे चालणे, थांबणे आणि सायकल चालवणे आता अधिक आनंददायी व सोयीचे झाले आहे.




या उपक्रमांची दखल आता राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून, महापालिकेला केंद्र सरकारच्या वतीने “शहरी वाहतूक उत्कृष्टता पुरस्कार” देऊन गौरवण्यात आले आहे. या पुरस्कारामुळे पिंपरी चिंचवड शहर देशभरात शाश्वत वाहतूक आणि नाविन्यपूर्ण आर्थिक नियोजनाचे आदर्श उदाहरण ठरले आहे. महापालिकेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे चालणे, सायकल वापरणे आणि सार्वजनिक वाहतुकीचा अवलंब वाढत आहे.

शहरात हरित, आरोग्यदायी आणि सर्वसमावेशक वाहतूक संस्कृती निर्माण करण्यासाठी हा सन्मान प्रेरणादायी ठरला आहे.




“पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे शहरात शाश्वत वाहतूक व्यवस्थेची पायाभरणी झाली आहे. हरित सेतू व टेल्को रोडसारखे प्रकल्प हे केवळ पायाभूत सुविधा नसून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी,आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीकडे नेणारे उपक्रम आहेत. केंद्र सरकारकडून मिळालेला 'शहरी वाहतूक उत्कृष्टता पुरस्कार' हा पिंपरी चिंचवडच्या सर्व नागरिकांचा आहे आणि भविष्यातील शाश्वत विकासाच्या दिशेने आमच्या बांधिलकीला बळ देणारा आहे.”

**श्रावण हर्डीकर,**
आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

“पिंपरी चिंचवड महापालिकेने शाश्वत शहरी वाहतुकी साठी वित्तीय स्वावलंबनाचा अभिनव मार्ग अवलंबला आहे. ग्रीन बॉण्डमुळे प्रकल्पांसाठी आवश्यक निधी वेळेवर उपलब्ध झाला आणि विकासाच्या गतीत मोठी वाढ झाली. हा पुरस्कार म्हणजे आपल्या प्रयत्नांना मिळालेली राष्ट्रीय पातळीवरील मान्यता आहे. हा सन्मान नागरिकांच्या सहभागानेच शक्य झाला.”

**विजयकुमार खोराटे,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पुररेषेची चिंता सोडा, एका स्क्वेअर फुटालाही धक्का लागणार नाही

## आमदार जगताप यांच्याकडून निळ्या पूररेषेबाबत नागरिक निर्धास्त !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : चिंचवड मतदार संघातील निळ्या पूररेषेसंदर्भात राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. हा प्रश्न राज्यस्तरीय असून त्यावर एकसंध धोरण तयार करण्यात येत आहे. यासाठी तज्ञ अधिकाऱ्यांची समिती देखील स्थापन करण्यात आली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतरच निळ्या पूररेषेसंदर्भात धोरणात्मक निर्णय होणार असल्यामुळे नागरिकांनी नाहक चिंता करण्याची गरज नसल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.**




दरम्यान चिंचवड परिसरातील अधिकृत बांधकामांच्या "एका स्क्वेअर फुटा"लाही धक्का लागणार नाही असे देखील आमदार जगताप यांनी सांगितले.चिंचवड येथे रविवारी (दि. ९) निळी पूररेषा बाधित गृहरचना संस्था, अपार्टमेंट येथील नागरिकांच्या समस्यांबाबत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी आमदार शंकर जगताप बोलत होते. यावेळी परिसरातील आजी माजी नगरसेवक, सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी आमदार जगताप म्हणाले निळी तसेच लाल पूररेषा या संदर्भात राज्य शासन स्तरावर पाठपुरावा केला जात आहे, या अनुषंगाने अनेक मागण्या देखील शासनाकडे मांडल्या आहेत.पूररेषेतील अधिकृत बांधकामांना पुनर्विकासासह अतिरिक्त टीडीआर वापरण्याची परवानगी द्यावी आणि एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये (यूडीसीपीआर) सुधारणा करून नागरिकांना न्याय द्यावा. तसेच चुकीच्या पद्धतीने दिलेल्या परवानग्यांवर चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी. हि मागणी केलेली आहे. हा प्रश्न फक्त चिंचवडपुरता नव्हे तर संपूर्ण राज्यातील "ब्ल्यू लाईन,रेड लाईन" क्षेत्रांचा आहे. म्हणूनच यासंदर्भात राज्यस्तरावर एकसंध धोरण तयार करण्याची गरज असल्याचे शासनाने मान्य केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यासंदर्भात जलसंपदा,नगरविकास व पर्यावरण विभागातील तज्ञ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आलेली आहे. ही समिती "ब्ल्यू लाईन आणि रेड लाईन" क्षेत्रांचा पुन्हा सर्वेक्षण करेल आणि त्यानुसार पूररेषांचे नवे मापन करून वास्तवातील परिस्थितीचा अभ्यास सादर करेल.

या समितीचा अहवाल आल्यानंतर शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, ज्यामुळे आताच्या अधिकृत इमारतींच्या पुनर्विकासास परवानगी देण्याचा मार्ग मोकळा होईल. यातून पिंपरी चिंचवड महापालिकेला सुमारे १२०० कोटी रुपयांचा महसूल देखील प्राप्त होणार आहे.

आमदार जगताप पुढे म्हणाले, मंत्रालय पातळीवर प्रत्येक विभागांमध्ये या संदर्भात पत्रव्यवहार सुरू असून, जलसंपदा विभागाकडून पुन्हा सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सर्व्हेमध्ये पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीलगत असलेल्या गावांतील पूररेषा नव्याने निश्चित केली जाणार आहे. वास्तविक जोते पातळी, नदी प्रवाह आणि बांधकाम स्थिरता यांचा तांत्रिक अभ्यास होणार आहे.

त्यामुळे जी बांधकामे गेल्या २५ वर्षांपासून अधिकृत रित्या

### शंकर जगताप

बांधलेली आहेत. त्या बांधकामांबाबत नागरिकांना चिंता करण्याची गरज नाही. चिंचवड परिसरातील या अधिकृत बांधकामांच्या "एका स्क्वेअर फुटा"लाही धक्का लागणार नाही असे देखील आमदार जगताप यांनी सांगितले.

नवीन बांधकाम परवानगी सोडून निवडणुकांपूर्वी नागरी सुविधांबाबत नागरिकांना कोणतीही अडचण राहणार नाही. मूलभूत सुविधांच्या संदर्भात एकही काम प्रलंबित राहणार नाही असे आश्वासन यावेळी जगताप यांनी दिले.

**मेळाव्यातून सोसायटीधारकांना मोठा दिलासा**

मेळाव्यामध्ये आमदार शंकर जगताप यांनी शासन स्तरावर सुरू असलेल्या पाठपुराव्या संदर्भात माहिती दिली. यामुळे एक प्रकारे दिलासा मिळाला असल्याची भावना सोसायटीधारकांनी व्यक्त केली. आमदारांकडून शासन स्तरावर निळ्या पूररेषेबाबत मोठा पाठपुरावा सुरू आहे. त्यामुळे हा प्रश्न निकालात निघेल असा विश्वास सोसायटी धारकांनी व्यक्त केला.

# राजगुरुनगर-खेडमध्ये आ. अमित गोरखे यांच्यावर प्रभारी म्हणून जबाबदारी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राजगुरुनगर : आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर-खेड मतदारसंघासाठी आमदार अमित गोरखे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.**



या नियुक्तीनंतर आमदार गोरखे यांनी स्थानिक पातळीवर इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या कार्यदृष्टी तसेच स्थानिक नागरिकांच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना जाणून घेतल्या.या मुलाखती काल राजगुरुनगर येथे आमदार अमित गोरखे, उत्तर पुणे ( मावळ )जिल्हा निवडणूक प्रमुख महेश लांडगे, जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडल्या. या वेळी पक्ष संघटनेतील पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी निवडणुकांमध्ये जनतेशी नाळ जोडलेले, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख उमेदवार पुढे यावेत, यासाठी या मुलाखतींचे आयोजन करण्यात आल्याचे आमदार गोरखे यांनी सांगितले.या प्रसंगी आमदार अमित गोरखे म्हणाले, "राजगुरुनगर-खेड मतदारसंघात जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची निष्ठा आमच्या सोबत आहे. आगामी निवडणुकीत येणारी सत्ता आमचीच असेल विकासाच्या ध्यासाने आणि जनतेच्या आशीर्वादाने विजयाचा झेंडा आमचाच फडकणार आहे." देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र या पर्वाची पुन्हा पुनरावृत्ती होणार!"

3
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 11/11/२०२5
e Paper
पिंपरी चिंचवड | पुणे

# पीसीसीओईआर च्या विद्यार्थ्यांचा अनाथ आश्रमात दीपोत्सव !

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव, संवेदनशीलता आणि मानवतावादी दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या सर्व शैक्षणिक शाखांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात.**



त्या अंतर्गत रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) ॲप्लाइड सायन्स अँड ह्युमॅनिटीज विभाग तसेच एफइएसए आणि लाइफ स्किल्स सेल विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी पीसीसीओईआर डॉ. हरीश तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली ताथवडे मधील निधी प्रेरणा भवन अनाथ आश्रम येथे दीपोत्सव साजरा केला. यावेळी विभागप्रमुख प्रा. शीतल पाटील, कार्यक्रम समन्वयक प्रा. प्रिया ओघे, प्रा. निलेश ठुबे, विद्यार्थी प्रतिनिधी पार्थ निकुंभ, अर्थव देशमुख, राजवर्धन शितोळे, वेदका पाटील, सौम्या बुकने, जिया आवटे, प्रणिता माणे, सनाथकुमार पोल, श्लोक पाटील, पुर्वेश चाटे आदी विद्यार्थी उपस्थित होते. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेचा आणि कलात्मकतेचा वापर करून आकाश कंदिल व हाताने रंगवलेले दिवे तयार केले होते. या वस्तूंची विक्री त्यांनी "दीपोत्सव" या उपक्रमातून केली होती. यामधून जमा झालेला निधी प्रेरणा भवन अनाथ आश्रम, ताथवडे आणि पिंपरी चिंचवड येथील वृध्दांना देणगी स्वरूपात देण्यात आला. तसेच महाविद्यालयाच्या वतीने धान्य, किराणा साहित्य, मिठाई आणि इतर आवश्यक वस्तू आश्रमात देण्यात आल्या. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी आश्रमातील अनाथ मुलांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या तसेच पीसीसीओईआर च्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# महापालिकेची आरक्षण सोडतीसाठी सर्व तयारी पूर्ण

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत कार्यक्रम ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने या आरक्षण सोडतीच्या कामासाठी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.**




सदर सोडत त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणूक विभागाची तयारी पूर्ण झाली आहे.महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडतीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर आज प्राधिकृत अधिकारी डॉ. पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली रंगीत तालीम देखील पार पडली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल कुबडे, स्मार्ट सिटीचे सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांच्यासह महापालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर, नगर सचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, निवडणूक विभाग उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पोलीस निरीक्षक अंकुश बांगर तसेच निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आलेले महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.डॉ. पुलकुंडवार यांनी आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने निवडणूक विभागाने केलेल्या तयारीची संपूर्ण माहिती घेतली.

तसेच आरक्षण सोडतीच्या दिवशी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. यावेळी पोलीस प्रशासन व महापालिकेच्या सुरक्षा विभागाच्या वतीने ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह व परिसरातील सुरक्षेचा आढावा घेण्यात आला.

### शासकीय वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी

११ नोव्हेंबर २०२५ रोजी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत होणार आहे. त्यामुळे ११ नोव्हेंबर रोजी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह परिसरात शासकीय वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी असणार आहे.

तरी आरक्षण सोडतीच्या ठिकाणी खासगी वाहने आणू नयेत, असे आवाहन महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा ; निखिल दळवी यांची मागणी

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड शहरातील प्रभाग क्रमांक 14 मधील दत्तवाडी, विठ्ठलवाडी, खंडेराया भाजी मंडई, विवेक नगर, तुळजाई वस्ती, भंगारवाडी, टेल्को कपूर कॉलनी, काळभोर नगर, रामनगर, खडीमशीन परिसर, मोहन नगर ,फुलेनगर ,गवळीवाडा ,चिंचवड स्टेशन या सर्व भागांमध्ये मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्याचे प्रमाण वाढले आहे.**



याचे त्रास रहिवासी नागरिकांना होत आहेत, या भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांच्या आरोग्यास देखील धोका निर्माण होत आहे. याकरिता या सार्वजनिक परिसरातील भटक्या कुत्र्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपशहर प्रमुख निखिल दळवी यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांना केली आहे.

निखिल दळवी यांनी निवेदनाद्वारे महापालिका आयुक्त यांना मागणी केली असून दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड प्रभाग क्रमांक 14 परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांचा सामना करावा लागत आहे. ही भटकी कुत्री रात्री येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांच्या गाडीचे मागे धावतात, लहान मुलांच्या मागे पळतात व चावतात तसेच नागरिकांच्या गाडी मागे धावतात, या भटक्या कुत्र्यांचा त्रास रहिवासी नागरिकांना होत असून, त्यांच्या आरोग्यास देखील हानी पोहोचत आहे. रहिवासी नागरिकांचे आरोग्य धोका देऊ शकते. नागरिकांना मोठी इजा होऊ शकते, याची शक्यता नाकारता येणार नाही. आता सर्वोच्च न्यायालयाने सर्व महानगरपालिकांना आदेश दिले आहे की, सार्वजनिक ठिकाणावरील सर्व भटक्या कुत्र्यांना बंदिस्त करून त्यांचा बंदोबस्त करावा.

तसेच प्रभाग क्रमांक 14 मधील येणाऱ्या सर्व परिसरात व भागांमधील सार्वजनिक ठिकाणी वावरणाऱ्या भटक्या कुत्र्यांना स्थलांतरित करून बंदिस्त करावे, जेणेकरून स्थानिक रहिवासी नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून वाचता येईल व भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांना धोका होणार नाही, तरी लवकरात लवकर प्रभाग क्रमांक 14 मधील सार्वजनिक ठिकाणी वावरणाऱ्या सर्व भटके कुत्र्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, असेही सदर निवेदनात नमूद करण्यात आले

# 'आरटीआय' कार्यकर्ते अमित कांबळे यांचा 'आप'मध्ये जाहीर प्रवेश!

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड शहरातील एक जुने आणि धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते, तसेच सक्रिय आरटीआय कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे अमित कांबळे यांनी आज पिंपरी चिंचवडमधील आम आदमी पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला आहे.**




पिंपळे निलख आणि विशाल नगर परिसरात सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या अमित कांबळे यांच्या प्रवेशामुळे 'आप'च्या पिंपरी चिंचवडमधील कार्याला नवी ऊर्जा मिळणार आहे.हा महत्त्वपूर्ण पक्षप्रवेश सोहळा पुणे मध्यवर्ती कार्यालय, येथे संपन्न झाला. 'आप'चे राज्य कार्यकारी अध्यक्ष अजित पाटील यांच्या हस्ते कांबळे यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. यावेळी प्रदेश समन्वयक अमित मस्के आणि प्रदेश सचिव अभिजीत मोरे हे देखील उपस्थित होते.'आप'मध्ये प्रवेश केल्यानंतर अमित कांबळे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले, "केजरीवाल मॉडेलचे शिक्षण, आरोग्य आणि पारदर्शक प्रशासन मी जवळून पाहिले आहे. पिंपरी चिंचवड शहरात उत्तम प्रशासन, पारदर्शकता आणि मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मी गेली अनेक वर्षे काम करत आहे. आता 'आप'च्या प्रामाणिक आणि विकासवादी राजकारणातून हे ध्येय साध्य करण्याची मला खात्री आहे. या नव्या प्रवासासाठी मी अत्यंत उत्सुक आहे आणि उत्साहाने काम करण्यास सज्ज आहे.

"यावेळी बोलताना अजित पाटील यांनी, "अमित कांबळे यांच्यासारख्या जिद्दीने काम करणाऱ्या आणि पारदर्शकतेची तळमळ असलेल्या कार्यकर्त्याचा 'आप'मध्ये समावेश होणे हे पक्षासाठी बळ देणारे आहे. त्यांच्या अनुभवाचा उपयोग शहर विकासासाठी निश्चितच होईल. अमित कांबळे यांच्या पक्षप्रवेशामुळे पिंपरी चिंचवडमधील आरटीआय चळवळ आणि स्थानिक सामाजिक प्रश्नांवरील लढा अधिक मजबूत होणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968

# लवकरच ...!

# मेट्रो सिटी

## आयकॉन अवॉर्ड २०२५




**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त**

## पुरस्कार सोहळा २०२५

वर्ष तिसरे मे

सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

– आयोजक –

## शबनम न्यूज मिडिया ग्रुप

शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स

अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734